# संगीत

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - सौंदर्यविचार, संपा. राजीव नाईक, विलास ढवळे, वसुधा अंबिये, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, मार्च १९८३)

वरील विषयाच्या संदर्भात १९७० पासूनचे दशक लक्षात घ्यावयाचे असे म्हणताच माझ्या मनापुढे एकदोन तांत्रिक प्रश्न उभे राहतात. दिलेल्या विषयातच तपासावयाचा सौंदर्यविचार शब्दरूप प्राप्त झालेला हवा, अशी अट आहे. आता कलाकाराने आपला सौंदर्यविचार शब्दरूप न देताही आपापल्या आविष्कारातून मांडलेला नसतो का? संगीतासारख्या प्रयोगसिद्ध कलांमध्ये अभाषिक विचारसंक्रमण होत नसते काय? खरे पाहता जिथे जिथे उच्च दर्जाचे संतुलन असते तिथे तिथे कार्यशील असणाऱ्या संकल्पना आणि यासाठी आवश्यक ती तार्किक संगती असतेच. पर्यायाने मूल्यात्मक संकल्पनांचा व्यूह, अंतर्गत निकषांचा संच, हा संच ज्यांवर वापरला जातो त्या पातळ्या (परीक्षण, कलास्वाद, अतिसौंदर्यशास्त्रीय इ.) यांसारखी सर्व मंडळी उपस्थित असतात. या सर्वांना शब्दरूप मिळणे महत्त्वाचे आणि सोयीचेही असेल; पण ते अपरिहार्य आहे का? आणखी पुढचा मुद्दा असा की, जे शब्दरूप मिळेल तेही लिखितच पाहिजे असा आग्रह आपण का धरावा? आजही मुख्यतः मौखिक परंपरेवर भिस्त ठेवून राहिलेल्या संगीतासारख्या कलेवर लिखित-मुद्रित अवतार जबरीने लादणे अदूरदृष्टीचे आहे. अशा आग्रहांनी सौंदर्यविचार पुढे जाणार नाही. विचारापासून आविष्कारपद्धतीपर्यंत सर्व पायऱ्यांवर साहित्य या एकाच कलेने शिपाईगिरी करणे हिताचे नाही. अ-भाषिक विचारसंक्रमणाचा प्रश्न जोपर्यंत सौंदर्यमीमांसा हाताळत नाही तोपर्यंत ती लंगडीच राहील. हा प्रश्न अत्यंत मूलगामी आणि तांत्रिक आहे आणि मराठी सौंदर्यविचार हा आता तत्त्वज्ञानाने पुष्ट झाल्यामुळे प्रौढ झाला याबाबत दिमाख मिरवणाऱ्यांना अजून हा प्रश्न जाणवलेला दिसत नाही. याचा अर्थ एकच होऊ शकतो, तो म्हणजे आपण खऱ्या अर्थाने तत्त्वज्ञानी नाही. प्रयोगसिद्ध कलांच्या बाबतीत निरक्षर असणाऱ्यांनी त्यांचा विचार करत रहावा यातूनच ही आपत्ती ओढवली आहे. ही कोंडी फोडली पाहिजे ती कलाकारांनी वेगळ्या तऱ्हेने (ही) कार्यरत होऊन व साहित्याधारी समीक्षकांनी अधिक नम्रपणे इतर कलांबाबत विद्यार्थीत्व स्वीकारून.

मर्ढेकरी वळणांशी परिचित झालेल्या अभ्यासकांना, म्हणजे स्थूलमानाने तत्त्वज्ञानी चर्चेस प्राधान्य देणाऱ्या घराण्यास, वामनराव देशपांडे यांच्या 'घरंदाज गायकी'ने (१९६१) संगीताबाबत सुप्रतिष्ठित केले. मर्ढेकरी संप्रदायाचा थोडाफार परिचय व त्यात शास्त्रोक्त हिंदुस्थानी कंठसंगीताचा निकटचा अभ्यास यामधून आपले सारे रसायन सिद्ध करण्याकडे वामनरावांचा रोख होता. आपण विचारात घेण्याचा कालखंड बराच पुढे असूनही या पुस्तकाचा उल्लेख करण्याचे कारण असे की, एकंदरीने पाहता मराठी सौंदर्यविचाराचे मर्ढेकरी वळण कसोशीने तपासण्याचे प्रयत्न १९७० च्या आसपास पूर्ण झाले व संगीतविचाराचेही तसेच झाले. प्रभाकर पाध्यांचे 'मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा' (१९७०) ग्रंथरूपाने १९७४ मध्ये प्रसिद्ध झाले असले तरी त्याचे पूर्ण लिखाण १९७०-७१ ला तयार झाले होते. वामनरावांनी चाचपडत घेतलेले मर्ढेकरी वळण संगीतविचारापुरते याच सुमारास मागे पडले. विशुद्ध संवेदना, लयसिद्धांत, कलासोपानपरंपरा, कलेचे माध्यम, सौंदर्यभावनेची कलासंबद्ध अपरिहार्यता इत्यादी अनेक बाबतींत मर्ढेकरी भूमिका संगीतास लागू पडत नाही, असे तर्कप्रतिपादन ठामपणे करण्यात आले. ('संगीताचे सौंदर्यशास्त्र', १९७१.)

खास करून सांगीतिक सौंदर्यविचारास वाहिलेले लेखन कमी असते, पण सर्वसाधारण सौंदर्यशास्त्रीय लिखाण करणाऱ्यांनी संगीतविषयक मुद्द्यांना स्पर्श केल्याची उदाहरणे असतातच. विविध तात्त्विक गरजांमुळे सांगीतिक वास्तवाशी पुरेशी घसट

नसतानाही अनेक विचारवंत संगीताला सोयीस्करशा तात्त्विक चौकटीत बसवू पाहतात. अशा परिस्थितीत त्यांना येणारे अपरिहार्य अपयश मुख्यतः एका कारणामुळे येते : त्यांची संगीतविषयक जाण अव्याप्तीच्या दोषाने युक्त असते. पण तरीही अनेकदा विचारात एक प्रकारचे ताजेपण आढळण्याची शक्यता असते. कारण निराळ्या संदर्भातून ते संगीताकडे येऊ पहात असतात. संगीत म्हणजे केवळ कलासंगीत नव्हे. संगीताच्या विविध परी असतात. त्या सर्वांचे मांड निरनिराळे असतात. त्या त्या प्रकारात, आविष्कार श्रेष्ठ-कनिष्ठ ठरविण्याचे निकषही वेगवेगळे असतात. निकषांचे असे संच प्रत्येक संस्कृतीत असतात. हे संच लवचिकपणे वापरत राहिल्यामुळे सौंदर्यविषयक सिद्धांतांचा एक 'चल' असा डोलारा सिद्ध होत असतो. अशा व्यापक आणि बहुविध व्यूहाचे भान असल्याकारणाने कलेचा विचार करताना, आजीबाईंच्या गळ्यातील थरथरती ओवीसुद्धा ध्यानात घ्यायला हवी, असा सूर अस्पष्टपणे का होईना, बागुलांच्या 'कलेचे विकेंद्रीकरण'मध्ये उमटलेला दिसतो (१९७१). याच संदर्भात निकषांची बहुविधता वारंवार सांगणारे पाटणकर महत्त्वाचे ठरतात. मुद्दा असा की, संगीताच्या सौंदर्यशास्त्राचा सवतासुभा हवा असे संगीतविचारकांना वाटू लागणे आणि एकंदरीने मर्ढेकरी भूमिकेवर सर्वांगीण आक्षेप घेतले जाऊ लागणे या दोन्ही घटनांचे समकालीनत्व हा काही केवळ योगायोग मानता येणार नाही. सौंदर्यशास्त्रीय हवामान निश्चितपणे जरा मोकळे होऊ लागले आहे. याच सौंदर्यशास्त्रीय लोकशाहीचे एक बोलके उदाहरण म्हणजे 'वाङ्मय व कला' यांच्याचपुरते आपले रसास्वादविवेचन मर्यादित ठेवणारे माधव आचवल. हेही पुस्तक १९७१चेच. संगीतविषयक भूमिका घेतलीच पाहिजे असे नाही या समजुतीने किंवा अशी भूमिका घेण्यासाठी आवश्यक ती सामग्री आपल्याकडे नाही असे मानल्यामुळे काहींनी आपले विवेचन मर्यादित ठेवले. पण जाण नसता संगीत आपल्या चौकटीत बसवण्यापेक्षा वरील दोन्ही दृष्टिकोण परवडतात, असे निश्चितपणे म्हणता येईल.

सौंदर्यशास्त्रीय गुदमरलेपण दूर होऊ लागण्याइतकीच महत्त्वाची म्हणण्यासारखी आणखी एक बाब गेल्या दशकातली म्हणून नोंदली पाहिजे. अनेक कारणांनी मराठीमधील संगीतविचार प्रमाणाबाहेर रसभरित राहिला आहे. मुख्यतः दोन प्रकारांनी : एक तर रसकल्पना आणि संगीतानुभवाची मूल्यात्मकता यांची अनिवार्य सांगड घालण्याच्या अट्टाहासातून, आणि दुसरे म्हणजे 'रसयुक्तता म्हणजे कर्णमधुरता' या मनात कुठेतरी खोलवर रुजलेल्या समीकरणातून. द. ग. गोडश्यांनी 'शक्तिसौष्ठव' (१९७२) या आपल्या ग्रंथाच्या विवेचनाचे मोहरे इतिहासमानववंशशास्त्र यांच्या अंगाने वळवले आहे हे खरे; पण सौंदर्य, रस, मधुरता यांसारख्या वाट बंद करणाऱ्या संकल्पनांच्या पलीकडे जाऊनही कलामूल्याचा छडा लावता येतो, हा त्यांच्या प्रयत्नामधील प्रतिध्वनी महत्त्वाचा. पोवाडा, गमकेची तान, वझेबुवांचे गाणे, अनेक वाद्यांचे ध्वनी इत्यादींना संगीतव्यवहारात आपापली सौंदर्यशास्त्रीय भूमिका आहे. या सर्वांची संगती लावायची तर एकतत्त्वाधारित सौंदर्यमीमांसाही उपयोगी नाही आणि रसचर्चाही. 'षड्ज-गांधार'सारख्या पुस्तकातले कृ. द. दीक्षितांचे संगीतवेध शक्य होतात ते या तथ्याच्या आकलनामुळे. खुद्द साहित्यसमीक्षकांनाही अधूनमधून रसचर्चेची अडगळ जाणवते, तर प्रयोगसिद्ध कलांची कथा काय? कलाकारानुसार, बंदिशीनुसार निकष बदलतात, आविष्काराचा रोख बदलतो, श्रोत्यांवरचा परिणाम बदलतो आणि संगीतकृतीचा अंतिम रूपभेदसुद्धा. हा विवेक न ठेवला तर संगीतप्रकार, संगीतवाद्ये, कलाकार, संगीतरूपे आणि श्रोत्यांचा सहयोग यांपैकी कशाचाच मागोवा घेता येणार नाही. आपल्या संगीतानुभवास पक्के राहावे, मग तत्त्वमीमांसेचे काय होईल ते होवो, अशी बेडर भूमिका संगीतमार्मिकांनी 'टेंबे युगोत्तरी' घेणे गरजेचे झाले होते. दीक्षितांनी तसे केले. अरविंद मंगरूळकरांनी आपले लेख संग्रहित केले नाहीत. शिवाय तुलनेने पाहता त्यांची वाटचाल साहित्यचर्चेचा संग न सोडता चालली होती. संगीतानुभव दोघांनीही घेतला हे निश्चित, पण मंगरूळकरांवरचा साहित्याचा पगडा सैल व्हायला वेळ लागला. आणि दीक्षितांनी तर तत्त्वचर्चेचा दावाच कधी केला नाही.

तसे पाहता सौंदर्यमीमांसकांपुढे संगीत अनेक प्रश्न उभे करते. संगीताचे रूप न समजते तर हे प्रश्न उलगडणे अशक्यप्राय म्हटले पाहिजे. या कारणाने केवळ साहित्याच्या आधाराने उभी राहू पाहणारी सौंदर्यमीमांसा, सर्वसाधारण सौंदर्यविचार आणि

सांगीतिक सौंदर्यविचार या दोघांनाही अडचणीची ठरू शकते. अनेक सौंदर्यशास्त्रीय प्रश्नांना संगीताची अशी खास उत्तरे आहेत; इतकेच नव्हे, तर ही उत्तरे नीट समजल्यास नाट्यसाहित्य, लोकसाहित्य व काव्याचे अनेक आविष्कार नीट समजतील, परिणामतः साहित्याची समग्र समज आणि एकूण निर्मिती यांना अधिक अनुकूल वातावरण तयार होईल. (या संदर्भात पुढील प्रश्नांचा निर्देश करता येईल : आशय आणि अभिव्यक्ती यांचे नाते, ध्वन्याधारित प्रतिमासृष्टी व कल्पनाशक्ती, अनेकेंद्रिय चेतना, लयविचार आणि कलात्म काल, कला, भावना व भावस्थिती इ.) संगीतविचार असा मोक्याच्या जागेवर उभा असल्याची जाणीव एकंदर सौंदर्यशास्त्रज्ञांना वाढत्या प्रमाणात होत आहे. प्रस्तुत जाणीव दोन तऱ्हांनी प्रगट होताना दिसते. पहिल्या प्रकारात साहित्याधारित सौंदर्यविचाराला संगीतविचाराची परिशिष्टे जोडली जातात ('रसग्रहण : कला आणि स्वरूप', गो. म. कुलकर्णी, १९७३; 'गतिमानी', द. ग. गोडसे, १९७६). किंवा दुसरा मार्ग म्हणजे खुद्द सौंदर्यशास्त्री मंडळी संगीताविषयी लिहितात - कमीअधिक प्रमाणात ('सौंदर्यानुभव', प्रभाकर पाध्ये, १९७९). आपल्या भूमिकेस पोषक अशी अवतरणे वा तत्सम पुरावे संगीतज्ञांच्या लिखाणातून उद्धृत करण्याच्या रूढ मार्गावर चालण्याच्या तुलनेत हे पाऊल अधिक धाडसी असते. आपापल्या औपपत्तिक संचिताच्या अनुषंगाने काही मूल्यात्म भूमिका घेऊन संबंधित संगीत आणि संगीतकार यांवर सौंदर्यशास्त्रीय झोत टाकण्याची या प्रयत्नात धडपड जाणवते. आपापल्या वैयक्तिक आवडीनिवडीपलीकडे जाऊन अभिरुचीशी संबंद्ध राहणारे विधान सिद्ध करण्याचा यात चंग बांधलेला असल्याकारणाने संगीतविचारकाला ही विवरणे तपासावी लागतात. या तपासणीत काय आढळते? अनेकदा असे आढळते की, व्यापक सांगीतिक वास्तवाशी परिचय नसल्याकारणाने वैयक्तिक आवडीनिवडीचीच विधाने केवळ सौंदर्यशास्त्रीय अंगरखे घालून वावरत आहेत. 'मला गाण्यातले फारसे कळत नाही' असे म्हणत म्हणत पाध्यांनी केलेले ऊर्मी, ऊर्जा इत्यादींचे विवेचन या प्रकारचे आहे.

एका दृष्टीने हे बरे; कारण यामुळे दृष्टिकोण समोरासमोर ठाकतील व चर्चेची शक्यता वाढेल. पण चर्चा अर्थपूर्ण व्हायची असेल तर साहित्याधारित सौंदर्यशास्त्र उभे करणाऱ्यांना सांगीतिक स्पर्शावर विसंबून चालणार नाही. संगीताचा प्रत्यक्षानुभव असणाऱ्यांनी लिहिते व्हावे हे खरे. प्रसंगी परस्परविरोधी वाटणारे लिखाण करण्यासही त्यांनी मागेपुढे पाहू नये. संगीताची जाण असलेले सौंदर्यशास्त्री उभे ठाकेपर्यंत संगीतकारांना वाट पुसत सौंदर्यशास्त्रज्ञांनी आपला उद्योग चालवावा हे बरे.